संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ

परिपत्रक

क्रमांक - संगाबाअवि/१/१०९/ २-३८० /२०२० दिनांक - ३० जून, २०२०

विषय - राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड-१९)चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय......
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व संलग्नित सर्व महाविद्यालये दि.३१ जुलै,२०२० पर्यंत बंद ठेवणेबाबत...

संदर्भ - १) परिपत्रक क्र.संगाबाअवि/१/१०९/२-३६४/२०२०, दि.१.६.२०२०.

२) परिपत्रक क्र.संगाबाअवि/१/१०९/२-३६५/२०२०, दि.१०.६.२०२०.

३) Easing of restrictions and phase-wise opening of Lockdown (MISSION BEGIN AGAIN) बाबत महाराष्ट्र शासन, महसुल व वने, आपत्ती व्यवस्थापन, राहत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे आदेश क्र. DMU/2020/CR.92,DisM-1, दि.२९ जून, २०२०.

राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड-२०१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून उपरोक्त संदर्भ क्र.१ व २ वरील परिपत्रकान्वये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभाग, विद्यापीठाचे मॉडेल डिग्री कॉलेज बुलढाणा तसेच विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये दि.३० जून, २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आलेल्या होत्या.

तथापि, उपरोक्त संदर्भ क्र.३ वरील शासन आदेशानुसार कोरोना विषाणुचे देशभरातील वाढते संक्रमण रोखण्यासाठी तेवढ्याच तत्परतेने व तीव्रतेने खबरदारी घेणे व विविध प्रतिबंधात्मक उपायांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत निर्देशित केले असून लॉकडाऊनचा कालावधी दि.३१ जुलै, २०२० पर्यंत वाढविण्यात आला आहे. त्यानुषंगाने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभाग व विद्यापीठाचे मॉडेल डिग्री कॉलेज, बुलढाणा तसेच विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये, दि.३० जून, २०२० च्या पुढेही दि.३१ जुलै, २०२० बंद राहतील.

उपरोक्त संदर्भ क्र.३ वरील शासन आदेशातील Annexure - II, मधील A) xvii) "The Offices/staff of Educational institutuions (Universities/Colleges/Schools) can operate only for the purpose of non-teaching purposes including development of e-content, evaluation of answer sheets and declaration of results" निर्देशानुसार विद्यापीठाचे मॉडेल डिग्री कॉलेज, बुलढाणा तसेच विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांनी आपले स्तरावर कार्यवाही करावी.

लॉकडाऊनच्या कालावधीदरम्यान शिक्षक, संशोधक, विद्यापीठाच्या प्रशासकीय विभागातील संवैधानिक अधिकारी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मुख्यालय न सोडता घरी राहून (Work form Home) संबंधित विभागाचे कामकाज करावे. त्याचप्रमाणे कोणत्याही अत्यावश्यक कार्यालयीन कामकाजाकरीता उपरोक्त संदर्भ क्र. ३ मधील मार्गदर्शक सूचनांमध्ये दिलेल्या १५ टक्केच्या अधीन राहून आळीपाळीने विभागामध्ये बोलवावे. तसेच नियंत्रण अधिकारी यांनी दररोज आळीपाळीने विभागात कामाकरीता बोलाविण्यात येणार असलेल्या कर्मचाऱ्यांची यादी उपकुलसचिव (आस्था.) यांना न चुकता सादर करावी. संबंधित शिक्षक, संशोधक, संवैधानिक अधिकारी व शिक्षकेतर कर्मचारी यांना कार्यालयात बोलविल्यास त्यांना कार्यालयात त्वरीत हजर रहावे लागेल, याची कृपया नोंद घ्यावी. कार्यालयात कार्यरत असतांना संबंधितांनी तसेच विद्यापीठात येणाऱ्या अभ्यागतांनी कोव्हीड-१९ च्या संदर्भात घ्यावयाच्या काळजीबाबत विद्यापीठ प्रशासनाने दि.२८.५.२०२० रोजी इ-मेल द्वारे प्रसृत केलेल्या मार्गदर्शन सूचनांनी सर्व संबंधितांनी नोंद घेऊन काटेकोरपणे पालन करावे.

उपरोक्त संदर्भ क्र.३ अन्वये प्राप्त शासनाच्या आदेशाचे काटेकोरपणे पालन करावे. लॉकडाऊनच्या कालावधीत कार्यालयामध्ये काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांनी "आरोग्य सेतू" App वापरणे बंधनकारक असून याची जबाबदारी संबंधित विभाग प्रमुख/नियंत्रण अधिकारी यांची राहील.

अत्यावश्यक सेवा (आरोग्य केंद्र, सुरक्षा विभाग, अभियांत्रिकी विभाग पाणी पुरवठा, विद्युत पुरवठा, उद्यान विभाग व इतर सेवा) पुरविणाऱ्या प्रशासकीय विभाग प्रमुखांनी याबाबत त्यांचे स्तरावर योग्य ते नियोजन करावे.

आदेशान्वये-

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**प्रत माहिती करीता सविनय सादर-**

१) मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२.
२) मा.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
३) सहसंचालक (उ.शि.), अमरावती विभाग, अमरावती
४) सहसंचालक (तं.शि.), अमरावती विभाग, अमरावती.

**प्रतीलिपी माहिती तथा आवश्यक कार्यवाहीकरीता**

१) सर्व शैक्षणिक विभाग प्रमुख/प्रशासकीय अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांना सूचित करण्यात येते की, उपरोक्त परिपत्रक त्यांच्या अधिनस्थ अधिकारी/कर्मचारी यांचे निदर्शनास आणून द्यावे व त्याचे काटेकोरपणे पालन करावे.
२) प्र.संचालक, मॉडेल डिग्री कॉलेज, बुलडाणा.
३) उपकुलसचिव (मवि), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांना सूचित करण्यात येते की, सादर परिपत्रक सर्व संलग्नित महाविद्यालयांच्या निदर्शनास आणावे.

उपकुलसचिव (प्रशा.)
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ